सत्यमेव जयते

# राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे

जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, ५ बी. जे. रोड, पुणे-४११००१
**फोन नं.(०२०) २६०५०६४१, २६०५१११०, २९७०६४११**
**ई-मेल आयडी :-** sceapune@gmail.com

**जाहिरात जावक क्रमांक: ८१२७/ २०१८**

दिनांक ३०/०३/२०१३ च्या अधिसुचनेव्दारे राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाची पुणे येथे स्थापना करण्यात आली असुन सदर प्राधिकरणात कंत्राटी पध्दतीने भरती करण्यासाठी उपरोक्त कार्यालयामार्फत राज्य शासनाच्या सेवेतुन सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी/कर्मचारी यांचेकडुन अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | पदनाम | पद संख्या | पदभरतीच्या माध्यमासाठी अर्जदार ज्या वेतनश्रेणीतुन सेवानिवृत्त झाला असेल त्या श्रेणीचा तपशिल | अनुज्ञेय परिश्रमिक |
|---|---|---|---|---|
| १. | लेखाधिकारी | १ | पीबी २ रु.९३३० – ३४८०० ग्रेड वेतन ४४०० | महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्रं. संकीर्ण – २७१५/प्रक्र. १००/ १३ दि.१७.१२.२०१६ चे निर्णयात नमुद केल्याप्रमाणे |
| २. | उच्च श्रेणी लघु लेखक | १ | पीबी २ रु.९३३० – ३४८०० ग्रेड वेतन ४४०० | |
| ३. | सहाय्यक प्रशासकीय अधिकारी | ४ | पीबी २ रु.९३३० - ३४८०० ग्रेड वेतन ४३०० | |

१. अर्जदारांनी त्यांचे अर्ज ए-४ कागदावर टंकलिखित करुन ते सदस्य सचिव, निवड समिती, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे ४११००१ या पत्त्यावर पाठवावेत.
२. अर्जदारांनी अर्जात त्यांची जन्मतारीख, सेवानिवृत्तीची तारीख, सेवानिवृत्ती वेतनाचे प्रदान आदेशाची छायांकित सत्य प्रत, पत्रव्यवहाराचा पत्ता, दुरध्वनी/भ्रमणध्वनी व ई-मेल आयडी क्रमांक इत्यादी बाबी ठळक व अचुक नमुद कराव्यात.
३. पदाच्या समकक्ष वेतनश्रेणीमधुनच सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी/कर्मचारी यांनी आवेदन पत्र सादर करावे.
४. प्राप्त अर्जाची छाननी करुन तोंडी मुलाखती घेण्यात येईल.
५. कंत्राटी पध्दतीने नियुक्त करावयाच्या अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या सेवा शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक सीबीई-१८९३/प्र.क्र.३८/९३/तेरा दिनांक १५/०२/१९९५, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक आरईएम-१५०९/प्र.क्र.५८/२००९/तेरा दिनांक १४/०१/२०१०, सामान्य प्रशासन विभाग दिनांक १७/१२/२०१६ मधील अटी व शर्तीनुसार असतील.
६. सदर जाहिरात वृत्तपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसांचे आत संबंधीतानी त्यांचे अर्ज पोस्टाने उपरोक्त पत्त्यावर पाठवावेत. स्वहस्ते सुध्दा वरील पत्त्यावर विहीत मुदतीत स्वाकारले जातील. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.
७. सविस्तर जाहिरात मा.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे www.sahakarayuakta.com या वेबसाईटवर व राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण , महाराष्ट्र राज्य, पुणे कार्यालयाचे नोटीस बोर्डवर प्रसिध्द करणेत आली आहे.

सही/-
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य, पुणे

दिनांक- १४/११/२०१८

**अटी व शर्ती -:**

१. शासकीय विभाग व त्यांच्या अधिनस्त कार्यालयातील विविध विषयांसदर्भात **"विवक्षित सेवा/ कामांसाठी" विषयनिहाय एमपॅनलमेंट (Empanelment) करुन सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पध्दतीने उपलब्ध करुन घेण्यात येत आहेत.** उदा. आस्थापना विषयक बाबी / सेवा प्रवेश नियम, पायाभुत सुविधा निर्मिती, नागरी सेवा पुरविणे, निवडणूक योजनांचे मुल्यमापन इ. आवश्यकतेप्रमाणे इतर विवक्षित सेवा/कामांचा यामध्ये समावेश करण्यात येईल.

**अ. निवडप्रक्रिया व नियुक्ती –**

१. **नामिकासुचि (Panel)** – करारपध्दतीने "विवक्षित कामांसाठी" नेमणूका करण्यासाठी विहीत पध्दतीने जाहिरात देऊन "विवक्षित कामांसाठी" पात्र सेवानिवृत्त अधिकाऱ्यांकडुन अर्ज मागविण्यात येत आहेत .

२. **नामिकासुचीची (Panel) वैधता** – सदर नामिकासुचीतील व्यक्तीमधुनच करार पध्दतीने ११ महिन्यांकरीता नियुक्ती करण्यात यावी . सदर नामिकासुचीची वैधता जास्तीत जास्त ३ वर्ष राहील. तसेच त्या सुचीचा वार्षिक आढावा घेण्यात यावा.

३. वर्ग ३ कर्मचारी यांची दैनंदिन हजेरी व वर्ग २ ची हजेरी नोंदवणे आवश्यक राहील.

४. सेवानिवृत्त अधिकारी/ कर्मचारी यांनी प्रमाणित PPO सादर करणे आवश्यक राहील.

५ **बंधपत्र / हमीपत्र** – नियुक्तीच्या कालावधीत करार पध्दतीने विवक्षित काम पुर्ण करण्याची जबाबदारी संबंधित व्यक्तीची राहील, या आशयाचे बंधपत्र/हमीपत्र त्यांच्याकडुन घेण्यात यावे. तसेच सदर बंधपत्रात/हमीपत्रात, करार पध्दतीने नियुक्ती देताना शासनाने या निर्णयान्वये विहीत केलेल्या अटी व शर्ती, विभागाने निश्चित केलेल्या अतिरिक्त अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचा, तसेच करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीकडून नियमित सेवेत घेण्याबाबत अथवा इतर कोणत्याही हक्कांची मागणी करण्यात येणार नाही, याचा उल्लेख करण्यात यावा.

**६. नियुक्ती आदेश** – नामिकासूचीतील व्यक्तीकडुन बंधपत्र प्राप्त झाल्यानंतर करार पध्दतीने नियुक्ती देण्याबाबतच्या आदेशामध्ये "एमपॅनलमेंटचा विषय" "विवक्षित स्वरुपाचे काम" आणि ते काम पुर्ण करण्यासाठी अपेक्षित असलेल्या १ वर्षाच्या कालावधीसाठी नियुक्ती देण्यात येईल.

**७. करार पध्दतीने नियुक्तीची कालमर्यादा** – सदर कामासाठी करार पध्दतीने देण्यात येणारी नियुक्ती एका वेळी जास्तीत जास्त एका वर्षासाठी देण्यात येईल. परंतु अशा नियुक्ती गुणवत्तेवर व कामकाजाच्या आवश्यकतेनुसार वाढीव कालावधीकरीता दरवर्षी नुतनीकरण करण्यात येईल. मात्र एकुण कालावधी तीन वर्षापेक्षा अधिक असणार नाही.

**८. वयोमर्यादा** – शासकीय सेवेतून सेवेनिवृत्त झालेले मात्र वयाची ६५ वर्ष पुर्ण न झालेले अधिकारी/कर्मचारी करार पध्दतीने नियुक्ती करण्यास पात्र असतील मात्र नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्ती या वयाच्या ६५ व्या वर्षापर्यंतच कार्यरत राहु शकतील.

**ब) अर्हता व अनुभव –**

१. विवक्षित कामासाठी लागणारी विशेष अर्हता अथवा संबंधित कामाचा किमान तीन वर्षाचा अनुभव ही पुर्व अट असेल.

२. करार पध्दतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिकारी शारीरिक, मानसिक वा आरोग्याचा दृष्टीने सक्षम असावा. तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्याच्याकडे आवश्यक क्षमता असावी. व तसा किमान एम.बी.बी.एस. दर्जाचे डॉक्टरचा दाखला किंवा शासकीय वैदयकीय अधिकारी यांचो दाखला आवश्यक राहील.

३. करार पध्दतीने नियुक्त करावयाच्या सेवानिृत्त अधिकारी यांच्या विरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालु किंवा प्रस्तावित नसावी किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी. तसे अंतिम कार्यालयाचे प्रमाणपत्र / पत्र आवश्यक राहील

**क) मासिक पारिश्रमिक व भत्ते –**

1. **मासिक पारिश्रमिक** - शासकीय / निमशासकीय सेवा - मासिक पारिश्रमिक त्यांच्या करार पध्दतीने नियुक्तीच्या कालावधीसाठी दि.१७.१२.२०१६ रोजीच्या शासननिर्णया प्रमाणे राहील.

२. **भत्ते** :- दि.१७.१२.२०१६ शासन निर्णयामधील तरतुदीनुसार निश्चित होणाऱ्या मासिक परिश्रमिकाच्या "जास्तीत जास्त २५% इतक्या मर्यादेपर्यंत एकमुस्त रक्कम "निवास भत्ता, प्रतिमाह अनुज्ञेय असेल. सदर रक्कम नियुक्त करावयाच्या अधिकारी / कर्मचारी यांची कार्यक्षमता, कार्यकुशलता, त्यांना पुरविण्यात आलेल्या सोयीसुविधा इ. बाबी विचारात घेऊन निश्चित करण्यात यावी.

(मासिक परिश्रमिक व भत्त्यांची परिगणना करण्याबाबतचे मार्गदर्शनपर उदाहरण या शासन निर्णया सोबतच्या परिशिष्ट-अ येथे उध्दृत करण्यात आली आहेत.)

३. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तिंच्या परिश्रमिकापोटी व भत्त्यांपोटी होणारा खर्च संबंधित कार्यालयाच्या "कार्यालयीन खर्च" या शिर्षाखाली उपलब्ध असलेल्या तरतुदीतुन भागविण्यात येईल.

**ड ) इतर अटी व शर्ती :-**

i. करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे/ सामावुन घेण्याचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार / हक्क नसेल.

ii. नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिकाऱ्यांच्या करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

iii. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती, सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेला नसावी.

iv. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीने गुंतलेले हितसंबंध (conflict of interest) जाहिर करणे आवश्यक राहील.

v. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीनी त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे/माहिती व आधारसामुग्रीबाबत गोपनियता पाळणे आवश्यक राहील.

vi. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पुर्ण करणे आवश्यक राहील. त्यांच्या कामकाजाबाबत नियुक्तीसाठी सक्षम असलेले प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेऊन कामाचे मुल्यमापण करतील. नमुना निश्चित करण्यात यावा.

vii. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रदान करता येणार नाहीत. (उदा. आहरण व संवितरण अधिकारी म्हणून प्राधिकार देता येणार नाहीत.)